राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचपयत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र


क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ६ मे, २०२२.

**प्रति,**

**जिल्हाधिकारी,**
**अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,**
**लातूर, अमरावती व चंद्रपूर.**

**विषय:- राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.**

**संदर्भ:** १) आयोगाचे क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७/१२/२०२१ रोजीचे आदेश.
२) राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांकाचा दि.२३/०२/२०२२ रोजीचा प्रभाग रचना कार्यक्रम.
३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम क्र. २१, (सुधारणा) अधिसूचना दि.११ मार्च, २०२२.
४) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१४/०३/२०२२ रोजीचे पत्र.
५) मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP **क्र.१९७५६/२०२१** मधील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.०४/०५/२०२२ रोजीचे आदेश.

महोदय/महोदया,

राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी **"क"** वर्गातील १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रभाग रचना कार्यक्रम दिला होता.

२. आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११ मार्च, २०२२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी, अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, सदर सुधारणेस अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०२/२०२२ च्या आदेशानुसार राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी "क" वर्गातील १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत पुढील कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतूदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी असे आयोगाने सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) यांना दि.१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते.

३. आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले, व मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर स्थगित केलेल्या टप्प्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही पुढे सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

४. त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्रमांक २ अन्वये जाहीर करण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचनेच्या कार्यक्रमाबाबत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

अ) राज्य निवडणूक आयोगाने वरील **परिच्छेद-१** मधील नमूद सर्व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.२३/०२/२०२२ रोजी प्रभाग रचना निर्गमित केला होता. सदर कार्यक्रमानुसार आक्षेप व हरकतीचा कालावधी दि.१०/०३/२०२२ ते दि. १७/०३/२०२२ असा होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP

**क्र.१९७५६/२०२१** मधील दि.०४/०५/२०२२ च्या आदेशास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाच्या दि.१०/०३/२०२२ रोजी सुरु असलेल्या टप्प्यांपासून निवडणुकांची कार्यवाही त्वरीत सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. यास अनुसरुन प्रारुप प्रभाग रचनेवर आक्षेप व हरकतीच्या टप्प्यापासून प्रभाग रचनेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत कार्यक्रम देण्यात येत आहे. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** नुसार आक्षेप व हरकतीच्या टप्प्यापासूनच्या सुधारित कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ब) प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/ का.६, दिनांक ०६/०२/२०२० अन्वये **संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

क) नगरपरिषद / नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता निवडणूक प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारूप अधिसूचना दि.१० मार्च, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून दि.१०/०३/२०२२ पासून प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींसह सुधारित कार्यक्रमानुसार नव्याने प्राप्त होणाऱ्या आक्षेप व हरकतींवर सुनावणी देण्यात यावी. तसेच सदर वेळापत्रकानुसार प्रत्येक टप्पा वेळेवर व योग्य रितीने पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. त्यानुसार त्यांनी योग्य ती सर्व उपाययोजना करावी.

५. नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम यथावकाश राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येईल.

६. राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार **परिशिष्ट-२** मधील नमूद नगरपरिषद/नगरपंचायतींबाबत प्रभाग रचना करण्यास बाधा येणारी कोणतीही बाब जसे न्यायालयीन प्रकरण इ.बाबतची माहिती आयोगास तात्काळ अवगत करावी.

७. **प्रसिध्दीबाबत :-** प्रभाग रचनेच्या अनुषंगाने विविध टप्प्यांवरील माहिती नगरपरिषद/नगरपंचायतींने वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. तसेच सदर कार्यक्रमास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट- १ व २

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन
४. संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीचे प्रशासक व मुख्याधिकारी.
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
८. निवड नस्ती/कार्या-६.

# प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२

## परिशिष्ट -१ (नगरपरिषद/नगरपंचायतींसाठी)

मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मधील दि.०४/०५/२०२२ च्या आदेशास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाच्या दि.१०/०३/२०२२ रोजी सुरु असलेल्या टप्प्यांपासून निवडणुकांची कार्यवाही त्वरीत सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत. यास अनुसरुन प्रारुप प्रभाग रचनेवर आक्षेप व हरकती पासून प्रभाग रचनेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत कार्यक्रम देण्यात येत आहे.

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-०६, दि.०६/०५/२०२२ सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा/ संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना** | | |
| १. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | १०/०५/२०२२ (मंगळवार) ते १४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत |
| २. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २३/०५/२०२२ (सोमवार) पर्यंत |
| ३. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | ३०/०५/२०२२ (सोमवार) पर्यंत |
| ४. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | ०६/०६/२०२२ (सोमवार) पर्यंत |

| | **ब) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या)** | | |
|---|---|---|---|
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०७/०६/२०२२ (मंगळवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगरपरिषद/नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट -२

# नगर परिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६, दि.०६/०५/२०२२ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर परिषद/नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा/स्थापनेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अहमदनगर | नेवासा न.पं. | १८/०६/२०२२ |
| २ | पुणे | मंचर न.पं. | नवनिर्मित (२९/११/२०२१) |
| ३ | सातारा | मेढा न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ४ | सांगली | शिराळा न.पं. | १४/०६/२०२२ |
| ५ | सोलापूर | अनगर न.पं. | नवनिर्मित (०१/११/२०२१) |
| ६ | लातूर | रेणापूर न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ७ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर न.पं. | २९/११/२०२० |
| ८ | चंद्रपूर | नागभीड नगरपरिषद | १६/०६/२०२२ |
| ९ | चंद्रपूर | भिसी न.पं. | नवनिर्मित (२६/११/२०२१) |